# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**परिपत्रक क्र. आस्थापना/निवडणूक /२०२१**

विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनीं यांना कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाचे उपरोक्त दि. ०३ ऑगस्ट, २०२१ चे पत्र यासोबत जोडले आहे. सदर पत्रान्वये दि. ०१ जानेवारी, २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. सदर कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **उपक्रम** | **कालावधी** |
|---|---|---|
| **पुनरिक्षण उपक्रम** | | |
| १ | **एकत्रिकृत प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणे** | दि. ०१ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) रोजी |
| २ | **दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी** | दि. ०१ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) ते<br>दि. ३० नोव्हेंबर, २०२१ (मंगळवार) |
| ३ | **विशेष मोहिमांचा कालावधी** | १) दि. १३ नोव्हेंबर, २०२१ (शनिवार) व<br>दि. १४ नोव्हेंबर, २०२१ (रविवार)<br>२) दि. २७ नोव्हेंबर, २०२१ (शनिवार) व<br>दि. २८ नोव्हेंबर, २०२१ (रविवार) |
| ४ | **दावे व हरकती निकालात काढणे** | दि. २० डिसेंबर, २०२१ (सोमवार) पर्यंत |
| ५ | **मतदार यादीची अंतिम प्रसिध्दीकरणे** | दि. ०५ जानेवारी, २०२२ (बुधवार) |

विशेष संक्षिप्त कार्यक्रमाची विद्यापीठे, महाविद्यालये यामध्ये नवमतदार नांव नोंदणीसाठी, मतदारांचे छायाचित्र प्राप्त करून घेणेसाठी, मतदार यांच्यांची तार्किक चुकांची दुरूस्ती करण्याबाबत या व मतदार यादीतील नांव वगळणेबाबत व्यापक प्रमाणात जाहीरात व प्रसिध्दी करण्यात यावी.

सदर मोहिमेबाबत आपल्या अधिविभागातील / महाविद्यालयातील / प्रशासकीय विभागातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना अवगत करावे तसेच काच फलकात प्रसिध्द करावे.

(सोबत विशेष संक्षिप्त कार्यक्रमाचे वेळापत्रक व माहिती जोडली आहे)

**कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/** 2318

**दिनाक :-** 26 OCT 2021

**प्रति,**

१. **सर्व अधिविभागप्रमुख, संचालक,समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक**
२. **मा.कुलगुरू,मा.प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.**
३. **सर्व महाविद्यालये**
४. **इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.**

- **यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

महत्वाचे/कालमर्यादा

क्रमांक: ईएलआर-२०२१/प्र. क्र. ३९०/२१/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२१.

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी(सर्व)

विषय :- ०१.०१.२०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम.

संदर्भ :- भारत निवडणुक आयोगाचे दि. ०३ ऑगस्ट,२०२१ रोजीचे पत्र

महोदय,

भारत निवडणूक आयोगाचे उपरोक्त दिनांक ०३ ऑगस्ट, २०२१ चे पत्र यासोबत जोडले आहे. सदर पत्रान्वये दिनांक १ जानेवारी, २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. सदर कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपक्रम | कालावधी |
|---|---|---|
| पुर्व - पुनरिक्षण उपक्रम | | |
| १. | i. दुबार/समान नोंदी, एकापेक्षा अधिक नोंदी, तार्किक त्रृटी दुर करणे इ.,<br>ii. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेद्वारा घरोघरी भेट देऊन तपासणी/ पडताळणी,<br>iii. योग्यप्रकारे विभाग / भाग तयार करणे; आणि<br>iv. मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण व प्रमाणीकरण करणे | दि. ०९ ऑगस्ट, २०२१ (सोमवार) ते<br>दि. ३१ ऑक्टोबर, २०२१ (रविवार) |
| पुनरिक्षण उपक्रम | | |
| २. | एकत्रीकृत प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) रोजी |
| ३. | दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी | दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) ते<br>दि. ३० नोव्हेंबर, २०२१ (मंगळवार) ते |
| ४. | विशेष मोहिमांचा कालावधी | दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत, मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र यांनी निश्चित केलेले दिवस |
| ५. | दावे व हरकती निकालात काढणे | दि. २० डिसेंबर,२०२१ (सोमवार) पर्यंत |
| ६. | मतदार यादीची अंतिम प्रसिध्दीकरणे | दि. ०५ जानेवारी, २०२२ (बुधवार) |

२. सदर पुनरिक्षण कार्यक्रम हा दि. ०१.०१.२०२२ या अर्हता दिनांकावर आधारित विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम असेल. सदर कार्यक्रम वरील वेळापत्रकानुसार राबवावयाचा आहे.

३. पुर्वतयारी:-भारत निवडणुक आयोगाने निर्देशित केलेल्या १ जानेवारी, २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत दि.०१ नोव्हेंबर, २०२१

रोजी प्रारुप मतदार याद्याची प्रसिध्दी करावयची आहे. सदर प्रसिध्दी करण्यापुर्वी पुनरीक्षणाची पुर्व तयारी म्हणुन खालील उपक्रम (Activities) हाती घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(२) मतदान केंद्राचे सुसुत्रिकरण करुन व पुरवणी मतदार याद्यांचे मुळ यादीमध्ये विलिनीकरण व एकत्रिकरण करुन प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करावयाची आहे. याकरिता दि. ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत आपल्या जिल्हयातील विधानसभा मतदार संघातील भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ज्या यादी भागांचे सुसुत्रिकरण करावयाचे आहे. त्यावर कार्यवाही करुन व राजकीय पक्षांचे बैठक घेऊन मतदान केंद्राचे प्रस्ताव या कार्यालयाकडे न चुकता सादर करण्यात यावे. त्यानंतर सदर प्रस्ताव भारत निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येतील. सदर कार्यवाही झाल्यानंतर दि.१० ऑक्टोबर २०२१ पर्यंत मतदार याद्यांचे विलिनिकरण व एकत्रिकरण करण्यात येणार आहे. विलिनिकरण व एकत्रिकरण करताना व प्रारुप मतदार यादी तयार करताना ERO-NET मधील मतदार यादीमधील नोंदीची वाढ , वगळणी व दुरुस्ती स्थगित करणे आवश्यक राहणार आहे. सदर प्रक्रिया प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर पुन्हा सुरु होतील.

(३) मतदार याद्यांच्या प्रारुप प्रसिद्धीसह प्रत्यक्ष मतदार याद्यांच्या पुनरिक्षणास प्रारंभ होत असतो. तथापि, मतदार यादी अद्यावत व शुद्ध होण्याच्या एकमेव हेतूने, मतदार याद्यांचे पुनरिक्षण प्रत्यक्षात सुरू करण्यापूर्वी खालीलप्रमाणे पुर्वतयारी करणे आवश्यक आहे.

अ. **दुबार/समान नोंदी यांची वगळणी करणे (एकापेक्षा अधिक नोंदी)**

यामध्ये भारत निवडणूक आयोगाच्या प्रणालीव्दारे दर्शविण्यात आलेल्या दुबार/समान नोंदीची तपासणी/पडताळणी करून वगळणी करण्याबाबत भारत निवडणुक आयोगाने दि. १३ ऑगस्ट, २०२१ च्या पत्रान्वये सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार दुबार/समान नोंदी (एकापेक्षा अधिक नोंदी) यांची वगळणी करण्यात यावी. सदर कार्यवाही दि.०५ ऑक्टोबर,२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

आ. **मतदार याद्यांमधील तार्किक चुकांची दुरुस्ती करणे.**

भारत निवडणूक आयोगाच्या प्रणालीव्दारे दर्शविण्यात आलेल्या तार्किक चुका (मतदार यादीतील तपशीलात लिंग पुरुष मात्र नातेसंबध पती इत्यादी तार्किक चुका). मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत तपासणी करुन ERO-NET मध्ये याबाबत दुरुस्ती करण्यात यावी. सदर कार्यवाही दि.०५ ऑक्टोबर,२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

इ. **समक्रमांकाचे एकापेक्षा अधिक मतदार ओळखपत्रांची नोंद असणे.**

भारत निवडणूक आयोगाच्या प्रणालीव्दारे समक्रमांकाचे एकापेक्षा अधिक मतदार ओळखपत्रांची नोंद असलेल्या मतदारांचे पडताळणी करुन त्यापैकी आधी नोंद असलेल्या मतदाराव्यतिरिक्त इतर मतदारांना नवीन क्रमांकाचे ओळखपत्र तयार करुन वाटप करणे आवश्यक आहे. तरी याबाबतची कार्यवाही दि.०५ ऑक्टोबर,२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

ई. **मतदार यादीत छायचित्र नसलेल्या मतदारांचे छायचित्र प्राप्त करुन घेणे.**

मतदार यादीत छायचित्र नसलेल्या मतदारांचे छायचित्र प्राप्त करुन घेऊन ERO-NET मार्फत मतदार यादीमध्ये अद्यावत करण्यात यावे. तसेच जे मतदार कायम स्वरुपी स्थलातरीत झालेले आहेत अथवा आढळून येत नाहीत/सर्वसाधारण रहिवाशी नाहीत. सदर मतदारांची भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार वगळणी करण्यात यावी. सदर कार्यवाही दि.०५ ऑक्टोबर,२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

मतदार याद्यांचे विलिनिकरण व एकत्रिकरण सुरु करण्यापूर्वी वरील कार्यवाही पूर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा सदर बाबी प्रारुप मतदार याद्यांमध्ये पुन्हा प्रतिबिंबित होतील.

उ. **मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण व प्रमाणीकरण करणे**

प्रारुप मतदार याद्या प्रसिध्द करण्यापूर्वी मतदार केंद्राचे सुसुत्रिकरण व प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. याकरिता या कार्यालयाचे पत्र क्र. ईएलआर-२०२१/प्र. क्र. ४३८ /२१/३३,दि. २४ ऑगस्ट, २०२१ च्या पत्रान्वये सविरतर सूचकना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मतदान केंद्राचे सुसुत्रिकरण करण्यात येऊन त्याबाबतचे प्रस्ताव दि. ३० सप्टेंबर,२०२१ या कार्यालयात सादर करण्यात यावेत. मतदान केंद्राचे सुसुत्रिकरण करण्याचे प्रस्ताव निरंक असल्यास त्यानुसार कळविण्यात यावेत. प्रारुप यादी प्रसिध्द करण्याच्या निर्धारित वेळेपुर्वी सदर बाबी कालबद्ध पद्धतीने पूर्ण काराव्यात.

४. **मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासंदर्भात प्रणाली व आज्ञावली यांचा वापर करणे व प्रशिक्षण -**

कोव्हिड-१९ च्या प्रार्दुभावामुळे मतदार नोंदणीसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत मतदारांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जाचे संगणीकरण करणे सोयीचे /कमी होणार आहे. तरी भारत निवडणूक आयोगाने ऑनलाईन दावे व हरकती सादर करण्यासाठी NVSP.in या संकेतस्थळ VOTER HELP LINE APP मध्ये सुविधा उपलब्ध आहे. सदर सुविधांचा जास्तीत जास्त प्रचार केल्यास त्यामुळे ऑनलाईन दावे व हरकती प्राप्त होतील. तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यासाठी भारत निवडणूक आयोगाने GARUDA APP विकसित केलेले आहे. सदर APP व्दारे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेले दावे व हरकती यांची GARUDA APP मध्ये डाटा एंट्री करुन ERO-NET मध्ये सादर करता येतील. तरी आपल्या जिल्हयातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी GARUDA APP त्यांच्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करुन वापर करण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

वरील परिच्छेद विचारात घेता, सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना NVSP.in या संकेतस्थळ VOTER HELP LINE APP आणि GARUDA APP याबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी व डाटा एंट्री ऑपरेटर /तांत्रिक सहायक यांना ERO-NET तसेच NVSP.in या संकेतस्थळ VOTER HELP LINE APP आणि GARUDA APP याबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षण देण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना व वेळापत्रक स्वतंत्रपणे पाठविण्यात येत आहे.

५. **घरोघरी भेट देऊन पडताळणी करणे -**

भारत निवडणूक आयोगाने सदर पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर घरोघरी भेट देऊन पडताळणी करणेबाबत. सुधारीत निर्देश दि.०९ सप्टेंबर,२०२१ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. त्यानुसार राज्यातील मनुष्यबळ व अन्य साधनांची उपलब्धता विचारात घेऊन आवश्यक असेल तिथे पडताळणी करावी. तसेच नोंद वगळणी प्रकरणी कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन /दक्षता घेऊन प्रत्यक्ष पडताळणी करुन वगळणी करण्यात यावी.

६. **अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांची नियुक्ती करणे -**

भारत निवडणूक आयोगाने दि. ०३ सप्टेंबर,२०२१ च्या पत्रान्वये सर्व साधारणपणे सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांनी वर्षभरात जास्तीत जास्त ७५०० दावे व हरकती हाताळणे अपेक्षित आहे. मात्र पुनरिक्षण कालावधीत सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांना जास्तीत जास्त ३००० दावे व हरकती वर कार्यवाही करण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. तरी मागील ५ वर्षात ज्या वर्षी जास्तीत जास्त दावे व हरकती प्राप्त झालेले आहेत. त्याबाबतचा आढावा घेऊन सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांची संख्या निश्चित करुन आवश्यकता असल्यास सहायक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्ती संदर्भातील प्रस्ताव त्वरीत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावेत.

७. ERO-NET चा वापर करणे -

या पुनरिक्षण कार्यक्रमात दावे व हरकतींची ERO-NET मध्ये संगणकीकरण करुन सहायक मतदार नोंदणी अधिकारी व मतदार नोंदणी अधिकारी यांनी सदर दावे व हरकती निकाली काढणे आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोगाने सुरक्षा विषयक Password पॉलीसी मध्ये बदल केला आहे. यासाठी डाटा एंट्री ऑपरेटर, सहायक मतदार नोंदणी अधिकारी व मतदार नोंदणी अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ERO-NET मध्ये लॉगीन करताना चुकीचे Password/OTP टाकल्यास सदर लॉगीन Lock होणार आहे. तरी अशा चुका होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच मतदार नोंदणी अधिकारी यांनी ERO-NET मध्ये स्वत: निर्णय नोंदविणे अपेक्षित आहे.

८. प्रारूप यादी प्रकाशन:-

तार्किक त्रुटी दूर करण्याशी संबंधित सर्व कामे, मतदारांचे छायाचित्र आणि मानक नसलेल्या EPIC आणि EPIC मालिकेचे विश्लेषण पूर्ण झाल्यानंतरच प्रारूप यादीचे प्रकाशन केले जाईल. सदर प्रारूप यादी तयार करताना, विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२१ ची अंतिम यादी, निरंतर पुनरिक्षण कार्यकमांतरगत तयार करण्यात आलेल्या पुरवणी याद्यांमधील वगळणी केल्या नोंदी वगळुन आणी कुटूंबातील मतदार एका ठिकाणी करून सदर याद्यांचे एकत्रिकरण करावे. निरंतर पुनरिक्षणातंर्गत केलेली मतदार नोंदणी, वगळणी आणि सुधारणा याबाबत भागनिहाय पुरविण्या तयार करुन त्या भविष्यातील संदर्भासाठी संग्रहित ठेवाव्यात. सदर माहिती कोणत्याही राजकीय पक्षास देऊ नये किंवा संकेतस्थळावर अपलोड करु नये.

९. दावे व हरकती निकालात काढणे:-

प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी यांनी विहित नमुन्यात प्राप्त दावे व हरकतींची यादी तयार करावी आणि अशा याद्यांची एक प्रत त्याच्या कार्यालयात सूचना फलकावर लावणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर देखील त्या उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे आयोगाचे निर्देश आहेत जेणेकरुन सर्व नागरिकांना संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे नोंदविलेल्या दावे आणि हरकतींची माहिती उपलब्ध होऊ शकेल. दावे व हरकतींची यादी सर्व राजकीय पक्षांना करुन द्यावी. दावे व हरकतींची यादी प्रसिद्ध झाल्यानंतर किमान सात दिवसांचा कालावधी संपल्यानंतर दावे व हरकतीं निकाली काढण्यात याव्यात.

१०. पर्यवेक्षक / सहायक मतदार नोंदणी अधिकारी / मतदार नोंदणी अधिकारी यांचेद्वारे पर्यवेक्षण व तपासणी:-

भारत निवडणूक आयोगाने पर्यवेक्षक / सहायक मतदार नोंदणी अधिकारी / मतदार नोंदणी अधिकारी यांचेद्वारे पर्यवेक्षण व तपासणीकरिता पुढीलप्रमाणे कार्यपध्दत निर्धारीत केलेली आहे-

I. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी केलेल्या कामापैकी ५% काम करावे.

II. सहायक मतदान नोदणी अधिकारी यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी केलेल्या कामापैकी १% काम व या व्यतिरिक्त १० मतदारांच्या घरोघरी जाऊन तपासणी करावी (असामान्य लिंगप्रमाणे, सर्वात जास्त मतदार नोंदणी किंवा वगळणी असलेल्या पहिले २० मतदान केंद्र ).

III. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सहायक मतदान नोदणी अधिकारी निकाली काढलेल्या अर्जापैकी १०% अर्जाची तपासणी करावी, तसेच याव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार मतदारांच्या घरोधरी जाऊन तपासणी करावी.

IV. जिल्हा निवडणूक अधिकारी त्यांच्या जिल्हयातील ज्या विधानसभा मतदार संघात मतदार नोंदणी किंवा वगळणी जिल्हयाच्या सरासरीपेक्ष १% जास्त आहे किंवा मतदार नोंदणी किंवा वगळणी

कोणत्याही विधानसभा मतदार संघापेक्षा ३% ने जास्त आहे, अशा प्रकरणी तपासणी अहवाल आणि याबाबतचे सविस्तर समर्थन सादर करतील.

११. **अति महत्वांच्या व्यक्तींची नांवे चिन्हांकित (FLAGGED) करणेबाबत:-**

मतदार नोंदणी अधिकारी यांनी, सर्व दिव्यांग व्यक्ती आणि मतदार यादीतील खासदार / आमदार यांसह कला, पत्रकारिता, क्रिडा, न्यायपालिका व इतर क्षेत्रांतील सन्माननीय व्यक्तींची नांवे चुकीने वगळली जाऊ नयेत म्हणून त्यांचेकरीता डेटा बेसमध्ये योग्य ते चिन्हांकत चिन्हांकित करण्यात यावे.

१२. **राजकीय पक्षांबरोबर बैठकी आणि मतदार याद्यांच्या वाटणी:**

सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जिल्ह्यातील राजकीय पक्षांबरोबर बैठका घ्याव्यात आणि त्यांना पुनरिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक कळवावे आणि त्यांच्याकडून अपेक्षित सहकार्य घ्यावे. राजकीय पक्षांनी BLA नेमावेत यासाठी त्यांना विनंती करण्यात यावी. प्रारूप मतदार यादी आणि अंतिम मतदार याद्या प्रसिध्द झाल्यानंतर त्यांच्या संपूर्ण संचाच्या प्रती जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना प्रचलित तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच वगळणी करण्यात आलेल्या मतदारांची यादी देखील सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

१३. **प्रसिद्धी:-**

जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी SVEEP कार्यक्रमाच्या माध्यमातून संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची पुरेशी प्रसिद्धी करून जागरूकता मोहीम आखावी. राजकीय पक्षांसोबत नियमित कालावधीमध्ये तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर बैठका आणि नियमित पत्रकार परिषद आयोजित करण्यात याव्यात. ऑनलाईन मतदार नोंदणीसाठीचा Voter Helpline Mobile App बाबत महाविद्यालयात, सिनेमागृहात, जाहिरात, केबल टिव्ही इत्यादीमार्फत मोठ्या व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे देण्यात येत आहेत.

१४. **दावे व हरकती फेटाळणे -**

प्राप्त दावे व हरकती फेटाळताना त्याबाबत /कमतरता/त्रुटीबाबत सदर दावे व हरकती वर फेटाळण्याचे कारण नोंदिविणे आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, दावे व हरकती कारण नमूद न करता/ विनाकारण /स्विकृत करण्यास पात्र असताना देखील सरसकट फेटाळण्यात येतात. याबाबतीत भारत निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली असून, दावे व हरकती सरसकट फेटाळण्यात येऊ नये असे निर्देश सर्व सहायक/मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात यावेत. तसेच मोठया प्रमाणात दावे व हरकती फेटाळण्यास येत असल्यास अशा दावे व हरकतींची सरमिसळ (Random) तपासणी आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

भारत निवडणूक आयोगाने उपरोक्तप्रमाणे निर्धारीत केलेल्या कार्यक्रमानुसार विहित कालावधीत कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना सूचित करावे, ही विनंती.

आपला,

(अ. ना. वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रत :- १. सर्व विभागिय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
२. उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व).
यांना कृपया माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

महत्वाचे/कालमर्यादा

क्रमांक: ईएलआर-२०२१/प्र. क्र. ३९०/२१/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२१.

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी(सर्व)

विषय :- ०१.०१.२०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम.

संदर्भ :- १. भारत निवडणुक आयोगाचे दि. ०३ ऑगस्ट,२०२१ रोजीचे पत्र
२. भारत निवडणुक आयोगाचे दि. ०९ सप्टेंबर,२०२१ रोजीचे पत्र

महोदय,

भारत निवडणूक आयोगाचे उपरोक्त दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ चे पत्र सोबत जोडले आहे.

भारत निवडणूक आयोगाने, १ जानेवारी, २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. सदर पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर घरोघरी भेट देऊन पडताळणी करणेसंदर्भात आयोगाने संदर्भाधीन पत्रान्वये निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्यातील मनुष्यबळ व अन्य साधनांची उपलब्धता विचारात घेऊन आवश्यक असेल तिथे पडताळणी करावी. तसेच मतदाराची नोंद वगळणी प्रकरणी कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना/ मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन प्रत्यक्ष पडताळणी करुन वगळणी करण्यात यावी.

भारत निवडणूक आयोगाचे उपरोक्त निर्देशाबाबत आपल्या अधिनस्त सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना सूचित करावे, ही विनंती.

आपला,

(अ. ना. वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रत :- १. सर्व विभागिय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
२. उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व).
यांना कृपया माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

By E-mail/Speed Post

# ELECTION COMMISSION OF INDIA

NIRVACHAN SADAN, ASHOKA ROAD, NEW DELHI -110001

No.23/2021-ERS (Vol.-III) Dated: 09th September, 2021

To,

The CEOs of all States & UTs
(except UT of Jammu & Kashmir)

**Subject: - SSR, 2022 – Pre-revision activities – H2H verification - regarding.**

Sir/Madam,

I am directed to refer to the Commission's letter No. 23/2021-ERS (Vol.-II), dated 3rd August, 2021, sending the schedule of SSR, 2022 and to state that the Commission has reviewed the status in view of the current situation of COVID-19 in the country and has directed that during pre-revision activities of ongoing SSR, 2022, the exercise of House to House (H2H) verification may be conducted as per requirement, availability of resources and man power in the state. However, field verification shall be done in cases of deletions, subject to the condition of observation of necessary precautionary measures during house visits.

2. The above instructions shall be informed to all concerned for strict compliance.

Yours faithfully,

(RITESH SINGH)
**UNDER SECRETARY**

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.ईएलआर - २०२१/प्र.क्र. ४७७/२१/३३,
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२,
दि. ०९ सप्टेंबर, २०२१.

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय :- विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम -२०२२ राबविण्याबाबत**

संदर्भ :- १. अवर सचिव, भारत निवडणूक आयोग यांचे पत्र क्र.४९१/ECI/LET/FUNC/SVEEP-I/SSR/२०२१, दि. ०२ सप्टेंबर, २०२१.
२. या कार्यालयाचे दि.०७.०९.२०२१ रोजीचे समक्रमांकित पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन भारत निवडणूक आयोगाचे दि.०२.०९.२०२१ रोजीचे पत्र या कार्यालयाचे दि.०७.०९.२०२१ रोजीच्या पत्राबत जोडून पाठविले आहे. सदर पत्रान्वये विशेष संक्षिप्त कार्यक्रमाची व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी, विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमासंदर्भात पुढील उपक्रम राबवून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाचा सविस्तर माध्यम / पोहोच (Media / Outreach Plan) आराखडा तयार करुन या कार्यालयास सादर करावा.
२. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व नेहरु युवा केंद्र (NYK) यांच्याशी समन्वय साधून युवकांचा मतदार यादीतील नोंदणीसाठी कृती आराखडा तयार करावा.
३. वंचित घटक (तृतीयपंथी, अपंग, महिला, वेश्या) यांच्याशी संबंधित संस्थांसोबत बैठका घेऊन त्यांच्या नोंदणीसाठी कृती आराखडा तयार करावा. तसेच सदर घटकांसाठी विशेष मोहिम राबवून त्यांची नाव नोंदणी वाढविण्यात यावी.
४. ज्या जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका होणार आहेत. अशा सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे सहकार्य घेऊन विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची प्रसार व प्रसिद्धी करण्यात यावी.
५. महिला बचत गट यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची प्रसार व प्रसिद्धी करुन महिलांची नाव नोंदणी करण्यात यावी.
६. सहकारी गृहनिर्माण फेडरेशन यांच्या सोबत बैठक आयोजित करुन सहकार गृहनिर्माण संस्थाच्या मार्फत जनजागृती करण्यात यावी.
७. पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात यावी. व्यापक प्रमाणात पत्रकार परिषद घेण्यात यावी जेणेकरुन कार्यक्रमाची व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिद्धी होईल.
८. कटक मंडळ (कंटोनमेंट बोर्ड) यांच्यासोबत बैठका आयोजित कराव्यात. तसेच त्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची प्रसार व प्रसिद्धी करावी.
९. विद्यापीठे, महाविद्यालये, निवडणूक साक्षरता मंडळे यांच्या बैठका आयोजित कराव्या व त्यांच्या माध्यमातून नवमतदार तरुणांना नाव नोंदणीसाठी प्रोत्साहीत करावे.
१०. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या मालकीच्या असलेल्या होर्डींगवर जाहीरात प्रदर्शित करावी.

११. सदर कार्यक्रमामध्ये सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, महामंडळे यांना सहभागी करुन घेण्यात यावे व त्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची प्रचार व प्रसिद्धी करण्यात यावी.

१२. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची सर्व समाज माध्यमातून तसेच इतर सर्व माध्यमातून व्यापक प्रमाणात जाहीरात व प्रसिद्धी करण्यात यावी.

२. उपरोक्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. याबाबतचा आढावा दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी होणाऱ्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये घेण्यात येणार आहे.

आपला,

(अ.ना. वळवी)
उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत - उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

महत्त्वाचे/कालमर्यादा

क्रमांक: ईएलआर-२०२१/प्र. क्र. ३९०/२१/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० ऑक्टोबर, २०२१.

प्रति,

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी(सर्व)

विषय :- ०१.०१.२०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम.

संदर्भ :- भारत निवडणुक आयोगाचे दि. ०३ ऑगस्ट,२०२१ रोजीचे पत्र

महोदय,

भारत निवडणूक आयोगाचे उपरोक्त दिनांक ०३ ऑगस्ट, २०२१ चे पत्र यासोबत जोडले आहे. सदर पत्रान्वये दिनांक १ जानेवारी, २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. आयोगाच्या निर्देशानुसार, दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत मतदार नोंदणीसंदर्भात विशेष मोहिमांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून त्यानुसार सदर कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपक्रम | कालावधी |
|---|---|---|
| पुनरिक्षण उपक्रम | | |
| १. | एकत्रीकृत प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) रोजी |
| २. | दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी | दि. १ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) ते<br>दि. ३० नोव्हेंबर, २०२१ (मंगळवार) ते |
| ३ | विशेष मोहिमांचा कालावधी | १) दि. १३ नोव्हेंबर, २०२१ (शनिवार) व<br>दि. १४ नोव्हेंबर, २०२१ (रविवार)<br>२) दि. २७ नोव्हेंबर, २०२१ (शनिवार) व<br>दि. २८ नोव्हेंबर, २०२१ (रविवार) |
| ४. | दावे व हरकती निकालात काढणे | दि. २० डिसेंबर,२०२१ (सोमवार) पर्यंत |
| ५. | मतदार यादीची अंतिम प्रसिध्दीकरणे | दि. ०५ जानेवारी, २०२२ (बुधवार) |

२. सदर विशेष मोहीमेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांची परिपुर्ण माहिती सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात संकलीत करून विशेष मोहिमेच्या विहित दिनांकास (त्याच दिवशी) या कार्यालयास सादर करावी. तसेच, विशेष मोहिमेबाबत आपल्या जिल्ह्यात व्यापक प्रसार व प्रसिध्दी करण्यात यावी आणि सर्व राजकीय पक्षांना अवगत करावे, ही विनंती.

आपला,

(अ. ना. वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी

# भारत निवडणूक आयोग

## नमुना-६

(पहा मतदार नोंदणी नियम, १९६० मधील नियम १३ (१) व (२६)

पोच क्रमांक ——————
(कार्यालयीन वापरासाठी)

**पहिल्या वेळी मतदार म्हणून किंवा एका मतदारसंघातून इतर मतदारसंघामध्ये स्थलांतरित झाल्यामुळे मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी करावयाचा अर्ज.**

प्रति, मतदार नोंदणी अधिकारी. .................................................................... विधानसभा/लोकसभा मतदारसंघ

नजिकच्या काळातील समोरच्या बाजूने संपूर्ण चेहरा दिसेल असे पासपोर्ट साईज छायाचित्र चिकटविण्यासाठी (३.५ सें.मी. × ३.५ सें.मी.) जागा

मी विनंती करतो/करते की, माझे नाव उपरोक्त नमूद केलेल्या मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावे.

(लागू तिथे खुण करावी)

पहिल्या वेळी मतदार म्हणून ☐ किंवा एका मतदारसंघातून इतर मतदारसंघामध्ये स्थलांतरित झाल्यामुळे ☐

मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबतच्या माझ्या मागणीच्या पृष्ठ्यर्थ खालील तपशील देण्यात येत आहे :—

**अनिवार्य तपशील**

| | |
|---|---|
| (अ) नाव | |
| (ब) आडनाव (असल्यास) | |
| (क) अर्जदाराच्या नातेवाईकाचे नाव व आडनाव [पहा बाब (ड)] | |
| (ड) नातं (लागू तिथे खुण करावी) | वडील ☐ आई ☐ पती ☐ पत्नी ☐ इतर ☐ |
| (इ) वय [चालू कॅलेंडर वर्ष .................... च्या १ जानेवारी रोजी] | वर्ष ☐☐ महिने ☐☐ |
| (फ) जन्म दिनांक (दिनांक/महिना/वर्ष च्या स्वरूपात) (माहित असल्यास) | ☐☐/☐☐/☐☐☐☐ |
| (ग) अर्जदाराचे लिंग (लागू तिथे खुण करावी)] | पुरुष ☐ स्त्री ☐ तृतीय पंथी ☐ |
| (ह) सध्याच्या सर्वसाधारण निवासाच्या ठिकाणाचा तपशील | घर क्रमांक |
| रस्ता/क्षेत्र/वसतिस्थान | |
| शहर/गाव | |
| डाक कार्यालय | पिन कोड ☐☐☐☐☐☐ |
| जिल्हा | राज्य/केंद्रशासित प्रदेश |
| (इ) अर्जदाराचा कायमचा पत्ता | घर क्रमांक |
| रस्ता/क्षेत्र/वसतिस्थान | |
| शहर/गाव | |
| डाक कार्यालय | पिन कोड ☐☐☐☐☐☐ |
| जिल्हा | राज्य/केंद्रशासित प्रदेश |
| (ज) ईपीक क्र. (दिले असल्यास) | |

**वैकल्पिक तपशील**

| | |
|---|---|
| (च) अपंगत्व (असल्यास) (लागू तिथे खुण करावी) | अंध ☐ मुकबधीर ☐ अस्थिव्यंग ☐ इतर ________ |
| (छ) ई-मेल (वैकल्पिक) | |
| (झ) मोबाईल क्र. (वैकल्पिक) | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |

**घोषणा**—मी माझ्या समजूतीने आणि विश्वासपूर्वक याद्वारे असे घोषित करतो/करते की,—

(१) मी, भारताचा नागरिक असून माझे जन्म ठिकाण, गाव/शहर ........................ जिल्हा ........................ राज्य ........................ आहे.

(२) मी, वरील परिच्छेद (ह) मध्ये दिलेल्या पत्त्यावर ................................ (दिनांक/महिना/वर्ष) पासून सर्वसाधारण रहिवाशी आहे.

(३) मी, अन्य मतदार यादीमध्ये माझे नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज केलेला नाही.

*(४) माझे नाव या आधी या किंवा अन्य कोणत्याही विधानसभा/लोकसभा मतदारसंघाच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले नाही.

किंवा

*मी या आधी खाली नमूद केलेल्या पत्त्यावर सर्वसाधारणपणे राहत होतो आणि * माझे नाव ———————————— या राज्यातील ———————————— मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट असण्याची शक्यता आहे आणि जर असेल, तर त्या मतदार यादीतून वगळण्यात यावे.

*लागू नसेल ते खोडावे.

२

# ELECTION COMMISSION OF INDIA

## FORM-6

Acknowledgement No. ____________

[See Rules13(1) and 26] of Registration of Electors Rule, 1960

(To be filled by office)

## Application for inclusion of Name in Electoral Roll for First time Voter OR on Shifting from One Constituency to Another Constituency.

To, The Electroral Registration Officer, .............................................. Assembly/Parliamentary Constituency

I request that my name be included in the electoral roll for the above Constituency. (Tick appropriate box)

As a first time voter ☐ or due to shifting from another constituency ☐

Particulars in support of my claim for inclusion in the electroral roll are given below:—

SPACE FOR PASTING ONE RECENT PASSPORT SIZE PHOTOGRAPH (3.5 CM X 3.5 CM) SHOWING FRONTAL VIEW OF FULL FACE WITHIN THIS BOX

**Mandatory Particulars**

| | |
|---|---|
| (a) Name | |
| (b) Surname (if any) | |
| (c) Name and surname of Relative of Applicant [See item (d)] | |
| (d) Type of Relation (Tick appropriate box) | Father ☐ Mother ☐ Husband ☐ Wife ☐ Other ☐ |
| (e) Age [as on 1st January of current calendar year.................] | Years ☐☐ Months ☐☐ |
| (f) Date of Birth (in DD/MM/YYYY format)(if known) | ☐☐/☐☐/☐☐☐☐ |
| (g) Gender of Applicant (Tick appropriate box) | Male ☐ Female ☐ Third Gender ☐ |
| (h) Current address where applicant is ordinarily resident | House No. |
| Street/Area/Locality | |
| Town/Village | |
| Post Office | Pin Code ☐☐☐☐☐☐ |
| District | State/UT |
| (i) Permanent address of applicant | House No. |
| Street/Area/Locality | |
| Town/Village | |
| Post Office | Pin Code ☐☐☐☐☐☐ |
| District | State/UT |
| (i) EPIC No. (if issued) | |

**Optional Particulars**

| | |
|---|---|
| (k) Disability (if any) (Tick appropriate box) | Visual impairment ☐ Speech & hearing disability ☐ Locomotor disability ☐ other ________ |
| (J) Email id (optional) | |
| (m) Mobile No. (optional) | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |

**DECLARATION**— I, hereby declare that to the best of knowledge and belief—

(i) I am a citizen of India and place of my birth is Village/Town......................... District.......................... State.....................

(ii) I am ordinarily resident at the address given at (h) above since ..................................................... (date, month, year).

(iii) I have not applied for the inclusion of my name in the electoral roll for any other constituency.

*(iv) My name has not already been inclited in the electoral roll for this or any other assembly/parliamentary constituency.

***OR***

* My name may have been included in the electoral roll for ........................................ Constituency in ..................................... State in which I was ordinarily resident earlier at the address mentioned below and if so, I request that the same may be deleted from that electroral roll.

* Strike off the option not appropriate.